# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र.०१** **//स्थायी समिती विशेष सभेचे कार्यवृत्त //** **दिनांक ३०/१०/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३०/१०/२०१८ मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ज्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिति सभापती पदाचे निवडीकरीता मा.श्री.किशोरराजे निंबाळकर, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी जळगांव जिल्हा जळगांव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.किशोरराजे निंबाळकर, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी जळगांव जिल्हा जळगांव**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बालाणी भगतराम रावलमल | ९ | सनकत चेतन गणेश |
| २ | ढेकळे सदाशिव गणपत | १० | सोनवणे सुरेश माणिक |
| ३ | अड.हाडा शुचिता अतुलसिंह | ११ | कापसे मयुर चंद्रकांत |
| ४ | बेंडाळे उज्वला मोहन | १२ | मराठे जितेंद्र भगवान |
| ५ | पोकळे दिलीप बबनराव | १३ | लढढा नितीन बालमुकुंद |
| ६ | कोल्हे प्रविण रामदास | १४ | भंगाळे विष्णु रामदास |
| ७ | खडके सुनिल वामनराव | १५ | बरडे नितीन मनोहर |
| ८ | पाटील प्रतिभा सुधिर | १६ | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

सदर सभेस मा.आयुक्त श्री.चंद्रकांत डांगे, उपायुक्त,श्री.लक्ष्मीकांत कहार, प्र.नगरसचिव, श्री.सुभाष मराठे उपस्थित होते.

**नगरसचिव :-** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०१८ नंतर अधिनियमातील कलम २०(२) मधील तरतुदीनुसार महासभा ठराव क्र ०१ दिनांक ११/१०/२०१८ अन्वये १६ सदस्यीय स्थायी समितीचे गठन करणेंत आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) चे तरतुदीनुसार व महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणुक घेणे) नियम २००७ व सुधारणा नियम १२ डिसेंबर २००८ नुसार स्थायी समितीचे सभापती पदासाठी स्थायी समितीची विशेष सभेची तारीख व वेळ तथा सभेचे पिठासीन अधिकारी नियुक्त करणेकामी महानगरपालिकेच्या पत्र क्र./न.स/६५ दि.१६/१०/२०१८ चे संदर्भानुसार मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्र. नपा२/१/६६३/२०१८ दि.२३/१०/२०१८ अन्वये पिठासीन अधिकारी यांचे संमतीने दि २३/१०/२०१८ रोजी विशेष स्थायी समीती सभेची सुचना निर्गमीत करुन सर्व स्थायी समिति सदस्यांना वितरीत करणेंत आल्या आहे. विषयसुचीवरील निवडीचे घोषीत कार्यक्रमानुसार दि.२४/१०/२०१८ ते दि.२६/१०/२०१८ या कालावधीत नामनिर्देशन पत्र नेणे, दि.२४/१०/२०१८ ते दि.२६/१०/२०१८ दुपारी ०१ वाजेपावेतो नामनिर्देशन पत्र दाखल करणे असे होते. मुदतीत स्थायी समिति सभापती पदासाठी **मराठे जितेंद्र भगवान** यांचे दोन फॉर्म आले असुन एका फॉर्मवर सुचक बालाणी भगतराम रावलमल तर अनुमोदक सनकत चेतन गणेश हे आहेत. दुसऱ्या फॉर्मवर सुचक ढेकळे सदाशिव गणपत तर अनुमोदक खडके सुनिल वामनराव हे आहेत.

सभापती पदासाठी आलेली एकाच उमेदवाराची नामनिर्देशनपत्रे छाननीसाठी मा.पिठासीन अधिकारी यांचेकडेस सादर करण्यांत येत आहेत.

**मा.पिठासीन अधिकारी :-** सभेस उपस्थित आयुक्त, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बंधू व सर्व स्थायी समिती सदस्यांचे मी स्वागत करीत आहे. ~~नगरसचिव~~ यांना प्राप्त झालेल्या नामनिर्देशित पत्रांची छाननी केली असता नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे घोषीत करण्यात येत आहे. सभापती निवडी संबंधात शासनाने केलेल्या नियमांचे नियम क्र.५ (३) चे तरतूदीस अनुसरुन उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्यासाठी त्यांना १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येत आहे. यावेळेस घडयाळात ११.०५ वाजलेले आहेत. येथून १५ मिनिटांचा कालावधी मोजण्यात येईल. त्यामुळे ११.२० वाजेपावेतो उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ शकतील.

**मा.पिठासीन अधिकारी :-** उमेदवारास आपली उमेदवारी माघार घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी माघार घेतली नसल्यामुळे मी श्री.किशोरराजे निंबाळकर पिठासीन अधिकारी जळगांव शहर महानगरपालिका जळगांव **मराठे जितेंद्र भगवान** यांची स्थायी समिति सभापती पदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषीत करीत आहे.

निवड झालेल्या नुतन सभापती **श्री.मराठे जितेंद्र भगवान** यांचे प्रशासनातर्फे अभिनंदन व स्वागत करण्यात येत आहे.

येणे प्रमाणे स्थायी समिति सभापती निवडीची सभा शांततेत पार पडली.

किशोरराजे निंबाळकर

( किशोरराजे निंबाळकर, )
पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी
जळगांव जिल्हा,जळगांव

Municipal Corporation Of the City Of Jalgaon
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

Scanned by CamScanner